N/155

मसुदा मान्यतेस्तव सादर

उप रचनाकार

सह. वास्तुशास्त्रज्ञ

व.न.र

मा. मु. नि.

मा. मु. का. अ.

# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

## अधिसूचना

क्र.मऔविम/आय.आय.ए./पी-२८९३६४/२०२६
महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१

ज्याअर्थी, शासनाचे उद्योग, उर्जा व कामगार विभागाची अधिसूचना क्र. आय.आय. ए. पॉलिसी-२०१०/प्र.क्र.७६८/उद्योग-२ दिनांक २२ फेब्रुवारी, २०१३ अन्वये महाराष्ट्राचे धोरण-२०१३ जाहीर करणेत आले. (यापुढे उक्त धोरण असे नमूद केले आहे.)

आणि ज्याअर्थी, जे क्षेत्र शासनाचे भूसंपादन कायदा, १८९४ अथवा महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ अन्वये भूसंपादित झालेले नाही, त्याचे क्षेत्रफळ हे किमान ४० हेक्टर असेल, अशा खाजगी क्षेत्रावर एकात्मिक औद्योगिक क्षेत्र विकसित करण्याची योजना राबविण्याचा निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतलेला आहे, की जी योजना उक्त औद्योगिक धोरणातील अनुसूची अ मधील परिच्छेद-४ (अ) व ४(ब) मध्ये नमुद आहे.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ चे कलम ४३-(१ब) नुसार महामंडळास कोणत्याही औद्योगिक क्षेत्राला राजपत्रातील अधिसुचनेव्दारे "एकात्मिक औद्योगिक क्षेत्र" म्हणून अधिसूचित करता येईल आणि अशी अधिसूचना काढल्यावर, महामंडळ हे, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ अन्वये अशा एकात्मिक औद्योगिक क्षेत्राकरीता विशेष नियोजन प्राधिकरण होईल.

आणि ज्याअर्थी मे.जुपिटर रिन्युएबल्स प्रा.लि यांनी अर्जान्वये प्रस्तावित मौजे. जुनापानी (रिठी), ता. हिंगणा, जि. नागपूर येथील ५४.७० हे.आर. क्षेत्राला "एकात्मिक औद्योगिक क्षेत्र" म्हणून घोषित करण्याची महामंडळास विनंती केली आहे.

आणि ज्याअर्थी, दि. १२/१२/२०२५ रोजी संपन्न झालेल्या १८२ व्या उच्चाधिकार समितीच्या बैठकीत मे. जुपिटर रिन्युएबल्स प्रा.लि यांचे प्रस्तावित मौजे. जुनापानी (रिठी), ता. हिंगणा, जि. नागपूर येथील क्षेत्राला एकात्मिक औद्योगिक क्षेत्र विकासाला सहमती दर्शविली आहे.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, उर्जा व कामगार विभागाने त्यांची अधिसूचना क्र. आय.डी.सी.२०२६/प्र.क्र.२९/उद्योग-१४,दिनांक ११ मार्च २०२६, अन्वये मौजे. जुनापानी (रिठी), ता. हिंगणा, जि. नागपूर येथील ५४.७० हे.आर. क्षेत्र महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ चे कलम २ खंड (ग) अन्वये "औद्योगिक क्षेत्र" म्हणून जाहिर केले आहे;

त्या अर्थी, शासनाचे महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ (सन-२०१३ चा सुधारणा अधिनियम, १५) च्या कलम ४३ खंड-(१ब) अन्वये महामंडळास प्रदान केलेल्या शक्तीचा वापर करुन, निम्नस्वाक्षरीकार म्हणजे मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ याव्दारे उपरोक्त अधिसूचना झालेल्या मौजे. जुनापानी (रिठी), ता. हिंगणा, जि. नागपूर येथील खालील अनुसुचित उल्लेखिलेल्या औद्योगिक खाजगी क्षेत्रास "एकात्मिक औद्योगिक क्षेत्र" म्हणून घोषित करीत आहे.

उक्त अधिसूचनेची प्रत व सोबत स्थळ निश्चिती चतु;सिमा दर्शविलेला नकाशा हा या अधिसूचनेचा भाग समजण्यात यावा.

## अनुसूची

मौजे जुनापानी (रिठी), ता. हिंगणा, जि. नागपूर

| अक्र. | सर्व्हे नंबर/हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर. |
|---|---|---|
| १. | १ | १.४२ |
| २. | २ | १.०७ |
| ३. | ३ | ३.९० |
| ४. | ५ | १.४३ |
| ५. | ६ | १.४३ |
| ६. | ७ | १.४३ |
| ७. | ८अ | २.४९ |
| ८. | ८ब | १.४८ |
| ९. | ८क | १.४८ |
| १०. | ८ड | १.४७ |
| ११. | ८इ | १.४७ |
| १२. | ९ | ५.९९ |
| १३. | १०अ | २.०० |
| १४. | १०ब | ०.२८ |
| १५. | ११ | ५.३४ |
| १६. | १२ | ४.८५ |
| १७. | १३अ | १.३४ |
| १८. | १३ब | १.३४ |

N/157

| | | |
|---|---|---|
| १९. | १४ | ३.०९ |
| २०. | १५ | ३.४४ |
| २१. | १७ | ३.६६ |
| २२. | १८ | १.८२ |
| २३. | ८९ | २.४८ |
| | एकुण | ५४.७० |

चतु : सीमा

उत्तरेस : मौजे मुरझडी शीव

दक्षिणेस : छत्रपती संभाजीनगर-नागपूर रस्ता.

पूर्वेस : स.नं. १६, २०, १९.

पश्चिमेस : मौजे कोहळा शीव.

ठिकाण : मुंबई-९३.

दिनांक : ०७/०४/२०२६

पी. वेलरासु, भा.प्र.से.
मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ